


दैनिक ठाणे
# जीवनदीप वार्ता

मुंबई ● नवी मुंबई ● ठाणे ● पालघर ● रायगड

शुक्रवार ■ ३० जानेवारी २०२६ ■ वर्ष - सातवे ■ अंक : २१४ ■ RNI No. MAHMAR/2016/7209 ■ किंमत - ०२ रुपये




## संपादकीय

### स्वप्न, लग्न आणि आयुष्य - सगळंच अपूर्ण...

राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह विमान दुर्घटनेत पाच जणांचा मृत्यू ही केवळ एक अपघाती घटना नाही, तर संपूर्ण महाराष्ट्राच्या मनाला छेद देणारी शोकांतिका आहे. या दुर्घटनेने सत्ता, पद, जबाबदाऱ्या यापलीकडे जाऊन माणुसकीच्या नात्यांवर खोल जखम केली आहे. या अपघातात सहपायलट शांभवी पाठक हिचा अकाली मृत्यू विशेषतः अस्वस्थ करणारा आहे. अवघ्या पंचवीस वर्षांचे आयुष्य, स्वप्नांनी भरलेले डोळे, उंच झेप घेण्याची महत्त्वाकांक्षा आणि कष्टातून घडवलेले करिअर — हे सारे एका क्षणात काळाच्या पडद्याआड गेले.

आकाशात झेप घेण्याचे स्वप्न पाहणारी शांभवी प्रत्यक्षात आकाशातच कायमची विलीन झाली, ही कल्पनाच काळीज पिळवटून टाकणारी आहे. मार्चमध्ये ठरलेले लग्न, नव्या घराचा गृहप्रवेश, आई-वडिलांच्या डोळ्यांतले आनंदाचे स्वप्न — हे सगळं काही क्षणार्धात उद्ध्वस्त झालं. दिल्लीतल्या सफदरजंग एन्क्लेव्हमधील नव्या घरात अजूनही न उघडलेल्या पेट्या आज अपूर्ण स्वप्नांची साक्ष देत उभ्या आहेत. काही दिवसांपूर्वी जिथे हास्य, चर्चा आणि नव्या सुरुवातीची चाहूल होती, तिथे आज नीरव शांतता आणि अश्रूंचे सावट आहे. हा अपघात आपल्याला पुन्हा एकदा आठवण करून देतो की प्रगती, तंत्रज्ञान आणि आधुनिकतेच्या शिखरावर असतानाही मानवी आयुष्य किती नाजूक आहे. विमान अपघात हा केवळ यांत्रिक बिघाड किंवा आकडेवारीचा विषय नसून, तो अनेक कुटुंबांच्या आयुष्याचा कायमचा वळणबिंदू असतो. एका निर्णयाने, एका क्षणाने, अनेक घरांतील दिवे कायमचे विझतात. शांभवी पाठकसारख्या तरुणी केवळ वैयक्तिक स्वप्न पाहत नव्हत्या; त्या देशाच्या विमानसेवेचे भविष्य घडवत होत्या. अशा हुशार, कर्तृत्ववान तरुणांच्या अकाली जाण्याने केवळ कुटुंबच नव्हे, तर समाजही गरीब होतो.

तिच्या जाण्याने निर्माण झालेली पोकळी कोणतीही श्रद्धांजली भरून काढू शकणार नाही.आज गरज आहे ती केवळ शोक व्यक्त करण्यापुरती मर्यादित न राहता, अशा दुर्घटनांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी कठोर उपाययोजना करण्याची. सुरक्षितता, प्रशिक्षण, देखभाल आणि जबाबदारी — या शब्दांना केवळ घोषवाक्य न ठेवता प्रत्यक्षात उतरवण्याची हीच वेळ आहे. आकाशात उडण्याचे स्वप्न पाहणाऱ्या शांभवीसह या अपघातात गेलेल्या सर्व आत्म्यांना हीच खरी श्रद्धांजली ठरेल — की त्यांच्या जाण्याने तरी व्यवस्थेचे डोळे उघडावेत.

# अजित दादा अनंतात विलिन

# दादा परत या.....

## लाडक्या अजित दादांना साश्रू नयनांनी अखेरचा निरोप !

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. २९ ● बारामती**

**'एकच वादा, अजित दादा', 'अमर रहे, अमर रहे, अजित दादा अमर रहे', 'परत या, परत या, अजित दादा परत या...' अशा हृदय पिळवटून टाकणाऱ्या घोषणांमध्ये, हजारोंच्या साश्रू नयनांनी राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांना अखेरचा निरोप दिला. दादा... दादा... असा हंबरडा फोडत उपस्थितांनी आपले दुःख व्यक्त केले.**

गुरुवारी दुपारी बाराच्या सुमारास विद्या प्रतिष्ठानच्या मैदानावर अजित दादांच्या पार्थिवावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. या वेळी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, गोव्याचे मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांच्यासह केंद्रीय मंत्री, राज्यमंत्री, राज्य मंत्रिमंडळातील सदस्य, खासदार, आमदार तसेच राजकीय, सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांनी अजित दादांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली.

"असा मनमिळाऊ, दिलखुलास आणि दिलदार नेता पुन्हा होणार नाही. इतक्या अवेळी अजित दादांसारखा उमदा नेता गमावल्याने प्रचंड धक्का बसला आहे," अशा भावना उपस्थित नागरिकांनी व्यक्त केल्या. संपूर्ण परिसर शोकसागरात बुडालेला दिसून आला. अजित पवार यांचे ज्येष्ठ पुत्र पार्थ पवार यांनी पार्थिवाला अग्नी दिला. त्या क्षणी उपस्थित हजारो नागरिकांच्या डोळ्यांत अश्रू तरळले. त्यानंतर 'महाराष्ट्राची शान, पुणे जिल्ह्याचा अभिमान, बारामतीचा आत्मा', 'राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष अजित दादा पवार अमर रहे', 'शेतकरी, कष्टकरी, बहुजनांचे कैवारी अजित दादा अमर रहे, अमर रहे' अशा घोषणा दिल्या गेल्या. दादा... दादा... असा आक्रोश संपूर्ण परिसरात घुमत होता.

"कोणतीही अडचण असो, आम्ही दादांकडे जायचो. दादांच्या एका शब्दाने अनेक अडथळे दूर व्हायचे. शब्द दिला की तो खरा करून दाखवण्याची धमक त्यांच्यात होती. आता काम घेऊन कोणाकडे जायचे? आमचे छत्र हरपले आहे," अशी भावना अंत्यसंस्कारासाठी आलेल्या मुल्ला समाजातील एका नागरिकाने व्यक्त केली. अजित दादांच्या जाण्याने बारामतीसह संपूर्ण महाराष्ट्रावर शोककळा पसरली असून, जनतेच्या मनात त्यांच्या आठवणी कायम राहणार आहेत.

# जिल्हा परिषद, पंचायत समित्यांच्या निवडणुका पुढे ढकलल्या

## ■ शासकीय दुखवट्यामुळे निवडणूक कार्यक्रमात बदल

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. २९**

**मुंबई : राज्यातील 12 जिल्हा परिषदा आणि त्याअंतर्गत 125 पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकांच्या तारखेमध्ये राज्य निवडणूक आयोगाने बदल केला आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनामुळे राज्यात जाहीर करण्यात आलेल्या तीन दिवसांच्या दुखवट्याच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय घेण्यात आला आहे.**

त्यानुसार 5 फेब्रुवार रोजी होणारे मतदान आता 7 फेब्रुवारी रोजी होणार असून आहे. तर मतमोजणीची तारीखही बदलून 9 फेब्रुवारी करण्यात आली आहे.

राज्य निवडणूक आयोगाने या निवडणुकांसाठी 13 जानेवारी 2026 रोजी सविस्तर निवडणूक कार्यक्रम जाहीर केला होता. त्या कार्यक्रमानुसार नामनिर्देशनपत्र दाखल करणे, नामनिर्देशनपत्र मागे घेणे, निवडणूक चिन्ह वाटप तसेच अंतिम उमेदवारांची यादी प्रसिद्ध करण्याची प्रक्रिया पूर्ण झाली आहे. मात्र मतदान, मतमोजणी आणि निवडून आलेल्या सदस्यांची नावे राजपत्रात प्रसिद्ध करणे हे टप्पे अद्याप शिल्लक होते.

### ■ दुखवट्यामुळे निवडणूक कार्यक्रमात बदल

उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे 28 जानेवारी रोजी अपघाती निधन झाल्यानंतर राज्य शासनाने 28 ते 30 जानेवारी 2026 या कालावधीत तीन दिवसांचा दुखवटा जाहीर केला. या कालावधीत कोणतेही सार्वजनिक कार्यक्रम न घेण्याचे निर्देश असल्याने निवडणूक प्रक्रियेतील उर्वरित टप्प्यांमध्ये बदल करण्याची गरज निर्माण झाली.

### ■ सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या मुदतीचा विचार

या जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांबाबत माननीय सर्वोच्च न्यायालयाने 31 जानेवारी 2026 नंतर फक्त दोन आठवड्यांची मुदतवाढ दिली आहे. त्यामुळे निवडणूक प्रक्रिया ठरलेल्या कालमर्यादेत पूर्ण करणे आवश्यक होते. या सर्व बाबी लक्षात घेऊन राज्य निवडणूक आयोगाने मतदान पान ३ वर ▶▶▶




# ठाणे ग्रामीण पोलीस अधीक्षक कार्यालय राज्यात प्रथम

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांचे संकल्पनेतून राज्यातील शासकीय कामकाजात सुधारणा व्हावी म्हणून महाराष्ट्रातील सर्व शासकीय कार्यालयात७निकषाप्रमाणे१५०दिवसांचा उपक्रम सुरू करण्यात आला होता. यामध्ये२००पैकी१६८.२५गुण मिळवून ठाणे ग्रामीण पोलीस अधीक्षक कार्यालय महाराष्ट्रात प्रथम क्रमांक पटकावत 'सर्वोत्तम पोलीस अधीक्षक कार्यालय, ठरले असून पोलीस अधीक्षक डॉ डि एस स्वामी यांच्या यशस्वी व कर्तव्यनिष्ठ नेतृत्वाखाली हा बहुमान मिळाल्याने जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा मानला जात आहे. कार्यालयीन कामकाज सुधारण्यासाठी मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांनी७निकष निश्चित केले होते. यामध्ये कार्यालयाची अधिकृत वेबसाईट, आपले सरकार प्रणालीचा वापर, ई-ऑफिस प्रणाली, कार्यालयीन डँशबोर्ड, व्हॉट्स अँप चँटबॉटचा वापर, शासकीय काम काजाऐआयआणिBlo




ckchainतंत्रज्ञानाचा वापर आणि जी आय एस तंत्रज्ञानाचा कार्यक्षम वापर समावेश होता.ठाणे ग्रामीण पोलीस अधीक्षक कार्यालयाकडून वरील सर्व प्रणालीचा योग्य वापर करुन शासकीय कामकाज अधिक गतिमान व पारदर्शक तसेच नागरिकांना सहजपणे वापर करता यावा म्हणून उत्कृष्ट कामगिरीचे मुल्यमापन भारतीय गुणवत्ता परिषद तर्फे गुणांकन देण्यात आले, यामध्ये ठाणे ग्रामीण पोलीस अधीक्षक कार्यालय ला २००पैकी१६८.२५गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावला, महाराष्ट्रातील ३६पोलीस अधीक्षक कार्यालये यात सहभागी झाले होते, संपूर्ण राज्यात सर्वोत्तम पोलीस अधीक्षक कार्यालय चा बहुमान ठाणे कार्यालयाला मिळाला असून हा ठाणे जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. याशिवाय सर्वसामान्य नागरिकांना जनजागृती करीता नावीन्यपूर्ण उपक्रमात अंतर्गत एक डिजीटल व्हॅन, सुरू करण्यात आली आहे. तसेच सुरक्षेसाठी लोक सहभागातून एक सीसीटीव्ही आपल्या सुरक्षेसाठी हा उपक्रम सुरू करण्यात आला आहे. हे सर्व यशस्वी करण्यासाठी डॉ डि एस स्वामी, एसपी ठाणे, अनमोल मित्तल, अप्पर पोलीस अधीक्षक, यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांच्या टिमने ही उल्लेखनीय कामगिरी बजावली आहे.त्यामुळे संपूर्ण जिल्ह्यातून पोलिसांचे कौतुक होत आहे.

# कल्याण कृषी उत्पन्न बाजार समिती, कल्याण

मा. शरदचंद्रजी पवार मुख्य बाजार आवार, एन टाईप इमारत, १ ला मजला,
कल्याण- शिळ रोड, कल्याण (प), जि. ठाणे ४२१ ३०१
दुरध्वनी क्रमांक (०२५१) २९७०३१६ ,e mail :- apmckalyan@rediffmail.com

## जाहिर सुचना

कल्याण कृषि उत्पन्न बाजार समितीच्या सर्व अनुज्ञप्तीधारक आडते, व्यापारी, प्रक्रिया करणार, हमाल, माथाडी, मापाडी व इतर बाजार आवारात काम करणा-या सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ व कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) नियम, १९६७ मधील तरतुदीनुसार बाजार वर्ष २०२६-२०२७ करीता अनुज्ञप्ती नुतनीकरणासाठी संबंधित अनुज्ञप्ती धारकांनी आपलेकडील समितीस येणे असलेल्या सर्व रक्कमांचा भरणा करून दिनांक २८.०२.२०२६ पुर्वी प्रत्यक्ष समितीच्या कार्यालयात उपस्थित राहुन अनुज्ञप्तीचे नुतनीकरण करणे करिता अर्ज करावेत. दिनांक २८.०२.२०२६ नंतर आलेले आडते, व्यापारी, प्रकिया करणार यांचे अर्ज अनुज्ञप्ती फी च्या प्रतिदिन १० टक्के विलंब आकार शुल्क घेऊन व हमाल मापाडी व माथाडी अनुज्ञप्तीधारकांना प्रतिदिन रू.१/- विलंब आकार शुल्क जितके दिवस विलंबाने सादर केला जाईल तितके दिवसांकरीता भरावा लागेल.

नुतनीकरणासाठी करावयाच्या अर्जाचे नमुने कल्याण कृषि उत्पन्न बाजार समिती कल्याण 'एन'टाईप इमारत, पहिला मजला, मुख्य मार्केट यार्ड, कल्याण शिळ रोड, कल्याण (प) जि.ठाणे येथे कार्यालयीन कामकाजाचे दिवशी व वेळेत मिळतील. विहीत माहितीसह भरलेले अर्ज कार्यालयीन वेळेत समितीचे कार्यालयात स्विकारले जातील. भरलेला विहीत अर्जासोबत खालील कागदपत्रे जोडणे आवश्यक आहेत.

१) अर्जदारांची स्वाक्षरी पडताळणी करीता अर्जदाराच्या आधारकार्ड, व पॅनकार्ड झेरॉक्स.
२) खरेदीदारांचे बाबतीत समितीचे बाजार आवारातुन शेतमाल खरेदी केलेल्या नोंदणीकृत अनुज्ञप्तीधारक व्यापा-यांची बाजार समिती सेस लावलेली छापील क्रमांक असलेली खरेदीच्या बिलाची झेरॉक्स.
३) डोमासाईल / वास्तव्याचा दाखल्याची झेरॉक्स प्रत.

अधिक माहितीसाठी समितीच्या कार्यालयात संर्पक साधावा.

**जा.क्र./कृउबास/ अनु. नुतनीकरण/**
**जाहिर सुचना / ७८७३/२०२६**
**दिनांक : २३/०१/२०२६**

**सही/-**
**सचिव**

**सही/-**
**सभापति**

**कल्याण कृषि उत्पन्न बाजार समिती, कल्याण**

# मुरबाड शहरात चोरटे पुन्हा सक्रिय

## माऊली नगर येथे भर दिवसा घर फोडून दागिने लंपास

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**मुरबाड** : मुरबाड शहरात गेले अनेक वर्ष तोंडलीकरनगर, माऊली नगर या परिसरात मोठ्या प्रमाणात घरफोड्या होऊन नागरिकांचे शेकडो तोळे सोने चोरीला गेले आहे, मात्र मुरबाड पोलीसांना आजपर्यंत एकही चोरीचा तपास करण्यात किंवा चोरट्यांना पकडण्यात यश आले नाही. विशेष म्हणजे यातील बहूतेक घरफोड्या दिवसा घर बंद असताना झाल्या आहेत.

शनिवार दि. 24 जानेवारी २०२६ रोजी माऊली नगर येथील दत्तकृपा निवास मधील आमदार किसन कथोरे यांच्या बंगल्या समोर राहत असलेल्या नारायण दत्तात्रय बांगर यांच्या घरी दुपारच्या सुमारास घरात कोणी नसल्याचा फायदा घेत चोरट्यांनी फ्लॅटचा दरवाजा तोडून कपाटातील सोन्याच्या अंगठ्या, ब्रेसलेट, चैन असा



पाच ते सहा तोळे सोन्याचे दागिने व पंचवीस हजाराची रोख रक्कम चोरून नेली आहे.

बांगर कुटुंब हे माघी गगपती उत्सव असल्याने आपल्या शेलारी गावी गेले होते.घरात कोणी नसल्याने याच संधीचा फायदा घेत चोरट्यांनी ही चोरी केली असल्याचे तक्रारदार नारायण बांगर यांनी म्हटले आहे. संध्याकाळी बाजूच्या रहिवाशांना बांगर यांच्या घराचा दरवाजा उघडा दिसल्याचे लक्षात आल्याने घरात चोरी झाल्याचे समजले.

स्थानिक आमदार किसन कथोरे यांच्या बंगल्या समोर ही चोरी झाली असल्यामुळे शहरातील नागरीक भयभित झाले असून एक चारचाकी गाडी चोरी होण्या अगोदर गेट समोर बराच वेळ उभी असल्याचे सिसीटीव्ही फुटेज मध्ये दिसत असूनही मुरबाड पोलीसांना मात्र अजुनही चोरट्यांना पकडण्यात यश आले नसून मुरबाडकरांमध्ये मात्र भितीचे वातावरण निर्माण झाले आहे.

दरम्यान काही महिन्यापुर्वी मुरबाड पोलीस स्टेशनला रूजू झालेले कर्तव्यदक्ष उपविभागीय पोलीस अधिकारी अनिल लाड साहेब व डॅशिंग पोलीस निरिक्षक दादासो एडके साहेब यांच्याकडून या चोरीचा व मागील झालेल्या घरफोड्यांचा तपास लावून नागरिकांना न्याय मिळवून देतील अशी अपेक्षा सामान्य मुरबाडकर व्यक्त करत आहेत.

# विरार-अलिबाग बहुउद्देशीय मार्गिका प्रकल्पामध्ये संपादित होणाऱ्या जमिनीची फेरचौकशी

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** : विरार-अलिबाग बहुउद्देशीय मार्गिकेच्या भूसंपादन मोजणीकरिता उप अधीक्षक भूमी अभिलेख, भिवंडी कार्यालयामार्फत फेरचौकशी तारखा नेमण्यात आलेल्या आहेत. मोजणीच्या वेळेस शेतकऱ्यांनी उपस्थित राहून आपल्या क्षेत्राची हद्द दाखवावी. शेतकरी उपस्थित न राहिल्यास मोजणी पूर्ण होऊ शकणार नाही आणि त्यानंतर संबंधित मोबदला दिवाणी न्यायालात जमा करावा लागेल, याची शेतकऱ्यांनी नोंद घ्यावी, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

हे भूसंपादन मोजणी काम शासनाच्या प्राधान्यक्रमावरील असल्याने या प्रकरणी शेवटची संधी म्हणून वरील नमूद गावनिहाय फेरचौकशी दिवशी भूमी अभिलेख कार्यालयातील मोजणी कर्मचारी हे प्रत्यक्ष जागेवर फेरचौकशी करण्याकरिता येणार आहेत. या दिवशी सर्व हितसंबंधित अधिकार अभिलेख (7/12) धारक यांनी पुराव्याच्या सबळ कागदपत्रांसह प्रत्यक्ष जागेवर उपस्थित राहावे अन्यथा प्रचलित नियमावलीनुसार कार्यवाही करण्यात येईल, याची नोंद घ्यावी, असे भिवंडी उप अधीक्षक भूमी अभिलेख सचिन हमजादे यांनी कळविले आहे.

# लोकल-मेल एक्सप्रेसमधील चोरीप्रकरणी दोघांना अटक

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** : मेल एक्सप्रेस व लोकल ट्रेनमध्ये वाढलेल्या चोरीच्या घटनांना आळा घालण्यासाठी लोहमार्ग पोलिसांनी विशेष मोहीम राबवली. गर्दीचा फायदा घेत प्रवाशांच्या गळ्यातील सोन्याची चैन व खिशातील मोबाईल फोन चोरी करणाऱ्या दोन आरोपींना कल्याण लोहमार्ग पोलिसांनी अटक केली आहे. त्यांच्याकडून एका गुन्ह्यातील सुमारे २० ग्रॅम सोन्याची चैन व १८ मोबाईल फोन, असा एकूण ७ लाख १५ हजार ४२५ रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

दिनांक १६ जानेवारी २०२६ रोजी कल्याण रेल्वे स्थानक



परिसरात गर्दीतून सोन्याची चैन चोरी झाल्याची तक्रार दाखल झाली होती. या गुन्ह्याच्या तपासासाठी सीसीटीव्ही फुटेजची पाहणी करून व सापळा रचून आरोपी दिलीप राम अवतार साहू व श्याम दिलीप साहू यांना ताब्यात घेण्यात आले. चौकशीत त्यांनी चोरीची कबुली दिल्यानंतर त्यांच्या घरातून चोरीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला. दिनांक २७ जानेवारी २०२६ रोजी दोन्ही आरोपींना अटक करण्यात आली असून पुढील तपास सुरू आहे.

# डंपरच्या चाकाखाली आल्याने महिलेचा मृत्यू

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : डोंबिवली पश्चिमेकडील महाराष्ट्रनगर येथील गोपीनाथ चौकात गुरुवारी दुपारी भीषण रस्ता अपघात झाला. दुचाकीवरून प्रवास करणारी एक महिला बाजूने जाणाऱ्या डंपरच्या मागील चाकाखाली आल्याने तिचा जागीच मृत्यू झाला. या दुचाकीवर महिलेबरोबर एक लहान मुलगाही असल्याची माहिती विष्णूनगर पोलिसांनी दिली आहे. पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, नम्रता नारायण साळवे (वय 65) असे अपघातात मृत्यू पावलेल्या महिलेचे नाव आहे. दुचाकी चालवत असताना बाजूने वेगात धावणाऱ्या डंपरच्या मागील चाकाखाली महिला सापडल्याने हा अपघात घडला. अपघातानंतर परिसरात एकच खळबळ उडाली. घटनेची माहिती मिळताच विष्णूनगर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. मृत महिलेचा मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी डोंबिवलीतील पालिकेच्या शास्त्रीनगर रुग्णालयात पाठवण्यात आला आहे. या अपघाताचा पुढील तपास विष्णूनगर पोलीस करत आहेत.

# पेण ग्रोथसेंटर बाबत सरकारने नेमकी वास्तविकता स्पष्टकरावी - सी.आर.म्हात्रे

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**पेण** : शहरासाठी औद्योगिक प्रकल्प,नवी मुंबई,मुंबई या शहरावरील ताण कमी करण्यासाठीच या केंद्राची स्थापना, औद्योगिक क्षेत्रात गुंतवणूक वाढविणे हा उद्देश,रोजगार निर्मिती, MMRDA साठी अनुकूल वातावरण,औद्योगिक झोन ,मध्यम,मोठे ,तयार करणे,लॉजिस्टिक पार्क,गोदामे,कामगार वसाहती,निवासी प्रकल्प,रस्ते,रेल्वे जोडणी ,शाळा ,रुग्णालये, व्यावसायिक सुविधा, यातून स्वतंत्र आकर्षक नवीन शहर निर्मिती. वीज इंटरनेट मोठ्याप्रमाणावर सुविधा निर्माण करणे.हे सर्व कागदावर सुंदर दिसते,मात्र यासाठी हे आशादायी चित्र तयार व्हायला १० ते १५ वर्षांपर्यंत वाट पहावी लागेल हे मात्र नक्की. पेण ग्रोथ सेंटर बाबत सरकारने नेमकी वास्तविकता स्पष्ट करावी असा खडा सवाल पेण वाशी खारेपाट्यातील सामाजिक कार्यकर्ते सी आर म्हात्रे यांनी केला आहे.

पेण ग्रोथ सेंटर यातून सरकारला थेट प्रश्नांची उत्तरे द्यावी लागतील ते म्हणजे पेण ग्रोथ सेंटरचा अधिकृत नकाशा, गट क्रमांक, अधिकृत जमीन क्षेत्र ,आजतागायत जाहीर का केले नाही? जमीन अधिग्रहण करताना शेतकरी, ग्रामसभा,स्थानिक स्वराज्य संस्था यांची परवानगी घेतली आहे का?घेतली असेल तर ती कागद पत्रे जाहीर करावी. या ग्रोथ सेंटरमुळे किती नागरिक विस्थापित होणार आहेत,त्यांच्या पुनर्वसनाची योजना कोठे आहे? पेण खारेपाट विभागात सात दिवसातून एकदा पाणी मिळत असताना या सेंटरसाठी पाण्याची व्यवस्था कोणती आहे.?नवीन जलस्त्रोत कोणता आहे. ते जाहीर केले गेले आहे का? पर्यावरण परिणाम अहवाल(EIA) तयार झाला आहे काय?,तयार झाला असेल तर जनतेसाठी खुला का केला नाही? कोणत्या उद्योगांना मंजुरी दिली आहे,ते प्रदूषणकारी आहेत का? याची हमी काय?या ग्रोथसेंटरमध्ये स्थानिकांना रोजगार किती टक्के मिळेल याची हमी मिळेल का?त्या बाबत सरकारी आदेश केव्हा निघणार आहे ग्रामपंचायत, नगरपालिका, पंचायत समिती यांना निर्णय प्रक्रियेत डावलण्याचे कारण काय? CSR निधीतून पेण तालुक्याची पाणी,आरोग्य,शिक्षण,रस्ते यासाठी किती निधी राखीव आहे,याची रुपरेषा कोठे आहे? ग्रोथ सेंटरचा माहिती जनतेला न देता हा प्रकल्प पुढे रेटण्याचा मतितार्थ कोणता आहे?सरकार पारदर्शकता घाबरतो का? असा सवाल ही पेण खारेपाट विभागातील सामाजिक कार्यकर्ते सी आर म्हात्रे यांनी केला आहे.

लोकांना विश्वासात न घेता,लोकशाही प्रक्रियेविना हा ग्रोथ सेंटर पुढे नेटाने नेणे योग्य आहे का?हा अधिकार सरकारला कोणी दिला?वरील सर्व प्रश्नाचीसमाधान कारक उत्तरे लोकांना देऊन...या प्रकल्पाचे बस्तान बसवावे लागेल.हे लक्षात असू द्या.

शेतकरी भूमिहीन होणार,गावे नाहीशी होणार,कुटुंब व्यवस्था,समाजव्यवस्था, नातीगोती संपणार..येथे मात्र गगनचुंबी इमारती , उभ्या राहतील आणि तेथे पहारेकरी हेच शेतकरी राहत असतील तर हा विकास काय कामाचा.. असा सवाल ही केला आहे.

# उडान महोत्सवात खर्डीच्या जीवनदीप महाविद्यालयाची दमदार भरारी

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई** : मुंबई विद्यापीठाच्या आजीवन शिक्षण व विस्तार विभागांतर्गत आयोजित 'उडान महोत्सवात' जीवनदीप महाविद्यालय, खर्डी येथील विद्यार्थ्यांनी आपल्या कलेचे प्रदर्शन करत घवघवीत यश संपादन केले आहे. साकेत महाविद्यालय, कल्याण येथे संपन्न झालेल्या या स्पर्धेत महाविद्यालयाने दोन स्पर्धांमध्ये प्रथम क्रमांक पटकावून ग्रामीण भागातील गुणवत्ता सिद्ध केली. या महोत्सवात ठाणे जिल्ह्यातील तब्बल ३३ नामांकित महाविद्यालयांनी सहभाग नोंदवला होता. अत्यंत चुरशीच्या ठरलेल्या या स्पर्धेत पाच वेगवेगळ्या कला प्रकारांत स्पर्धा पार पडल्या. यामध्ये जीवनदीप



महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी आपल्या कला प्रतिभेने सर्वांचे लक्ष वेधून घेतले.

पथनाट्य स्पर्धा: प्रथम क्रमांक
विजेते : (अर्जुन जाधव TYBSc IT, हार्दिक पाटील TYBSc IT, दीक्षा भगत TYBA, सारिका जाधव TYBAF, तेजस मढवी TYBAF , तेजस्विनी खतेले TYBA, सार्थक गोले TYBAF.)
वक्तृत्व स्पर्धा: प्रथम क्रमांक
विजेता: सार्थक निचिते(TYBSc)

विद्यार्थ्यांच्या या उज्ज्वल यशाबद्दल जीवनदीप शैक्षणिक संस्थेचे अध्यक्ष मा. श्री. रवींद्र घोडविंदे तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य मा. श्री. डॉ. कैलास कळकटे सर यांनी सर्व विजेत्या विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले व त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

या यशात प्रा. शरद खाकर व प्रा. रेश्मा घोडविंदे यांचे मार्गदर्शन मोलाचे ठरले.

# आंबेडकरी चळवळीतील स्वाभिमानी व डॅशिंग नेतृत्व बाळासाहेब भोईर यांचे निधन

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**अंबाडी** : ठाणे जिल्ह्यातील मौजे- आंबिवली येथील कायमचे रहिवासी असणारे आंबेडकरी चळवळीतील स्वाभिमनी,डॅशिंग,तसेच आपल्या तत्त्वांशी कुठेही आणि कधीही तडजोड न करणारे नेतृत्व बाळासाहेब भोईर यांचे आजारपणामुळे सोमवार दिनांक-26/01/2026 रोजी त्यांचे वयाच्या 73 व्या वर्षी दुःखद असे निधन झाले आहे.त्यांच्या पश्चात पत्नी, 4 मुली,1मुलगा व नातवंड असा परिवार आहे.दिवंगत- बाळासाहेब भोईर हे मोहने येथील एन्. आर.सी. कंपनीत नोकरीस असतानाही त्यांना सामाजिक क्षेत्रात कार्य करण्याची अत्यंत आवड असल्यामुळेच ते ज्या- ज्या ठिकाणी सामाजिक अन्याय,अत्याचाराच्या घटना घडायच्या त्या ठिकाणी ते खंबीरपणे आपले योगदान देऊन,अन्यायग्रस्तांना मदत करण्यात त्यांचा सिंहाचा वाटा होता.त्यामुळेच त्यांच्या या आक्रमक भूमिकेतून



त्याने "मराठवाडा विद्यापीठ नामांतर लढ्यात " सक्रीय सहभाग घेतल्याने त्यांना काही दिवस तुरूंगवास भोगाला लागला,त्यांच्यासोबत आंदोलनकर्ते सहकारी बाळासाहेब भालेराव, दिवंगत- हरेश दोंदे आदिंचाही सहभाग होता.

विशेषतः दिवंगत- बाळासाहेब भोईर हे ठाणे जिल्ह्यातील आंबेडकरी चळवळीतील डॅशिंग पॅन्थर नेतृत्व समाजात आदर्श,निःस्वार्थी, आणि आयुष्यात कधीही आपल्या विचारांशी तडजोड न करणारे असल्यामुळेच समाजात त्यांना खुपमोठा मानसन्मान होता. त्याने आंबेडकरी चळवळीत कार्य कलताना ठाणे जिल्हा " दलित पॅन्थर अध्यक्ष " " रिपाई कोकण प्रदेश अध्यक्ष " ठाणे जिल्हा बौद्ध संघ" आदि ठिकाणी त्यांनी आपल्या कामाचा विशिष्ट असा ठसा उमटवून आपली समाजाप्रती सेवा केली आहे. त्यामुळेच त्यांच्या अंत्यसंस्कारास समाजातील मान्यवर मंडळींपैकी शामदादा गायकवाड (रिपाई सेक्युलर रा.अध्यक्ष) सुरेश सावंत (रिपाई रा.उपाध्यक्ष आ.) अण्णासाहेब रोकडे (रिपाई महा. प्र.उपाध्यक्ष आ.) प्राचार्य रमेश जाधव ( जेष्ठ पॅन्थर नेते)डॉ. वि.सो.शिंदे (जेष्ठ साहित्यिक) प्रा.एकनाथ जाधव (जेष्ठ पॅन्थर नेते) प्रा. शुक्राचार्य गायकवाड (जेष्ठ साहित्यिक) जयवंतराव सोनावणे, (साहित्यिक व जेष्ठ नेते ठा.जिल्हा )ना.पां.जाधव (सेवानिवृत्त उपजिल्हाधिकारी) बाळासाहेब भालेराव,(रिपाई सरचिटणीस आ.ठा.जिल्हा) सुदाम संगारे (रिपाई जेष्ठ कार्यकर्ते) असे महत्त्वपूर्ण नेते त्याचबरोबर असंख्ये जनसमुदाय उपस्थित राहून आपल्या आवडत्या नेतृत्वाला भावपूर्ण आदरांजली व्यक्त केली.

# भविष्यवेध



**शुक्रवार**
**३० जानेवारी २०२६**

**मेष**
धीर आणि नम्रता बाळगा. आज मित्रांसोबत जुन्या समस्यांवर चर्चा केल्याने चांगला उपाय मिळू शकेल. तुमच्या सल्ल्याचा इतरांना फायदा होईल.

**वृषभ**
एखाद्या नातेवाईकाकडून चांगली बातमी मिळेल. तुमचा जोडीदार तुम्ही जे काही बोलता ते समजून घेण्याचा प्रयत्न करेल, ज्यामुळे तुमच्या नात्यात ताजेपणा येईल.

**मिथुन**
महत्त्वाच्या लोकांशी भेटीगाठी होण्याची शक्यता आहे. आज तुम्ही एक नवीन उपक्रम सुरू करू शकता. तुम्हाला नवीन गोष्टी शिकायला मिळतील.

**कर्क**
वैवाहिक जीवन सुसंवादी राहील. महिला ऑनलाइन नवीन पदार्थ शिकण्याचा प्रयत्न करतील. तुमचे वडील तुम्हाला पाठिंबा देतील. दिवस चांगला असेल.

**सिंह**
कुटुंबासमोर तुमचे मत व्यक्त करण्याची तुम्हाला भरपूर संधी मिळेल आणि तुमच्या योजना लोकांना खूप प्रभावित करतील. तुमची आर्थिक परिस्थिती मजबूत राहील.

**कन्या**
न्यायालयीन प्रकरणांना थोडा विलंब होऊ शकतो, परंतु सर्व काही वेळेत सोडवले जाईल. आज तुम्ही हाती घेतलेला कोणताही व्यवसाय यशस्वी होईल.

**तुळ**
मित्राकडूनही पाठिंबा मिळेल. कुटुंबियांशी हसतखेळत गप्पा मारल्याने ताण कमी होईल. दिवस मजेत जाईल. एक सखोल योजना आखा .पालकांचा सल्ला घ्या.

**वृश्चिक**
सरकारी धोरणे आणि नियमांकडे बारकाईने लक्ष दिल्यास काम सोपे होईल. मोठ्या प्रकल्पात पैसे गुंतवण्याचा विचार करत असाल तर जाणकार व्यक्तीचा सल्ला घ्या.

**धनु**
महत्त्वाच्या बाबी आणि नातेसंबंधांचा विचार कराल आणि नियोजन कराल. कुटुंबाशी संबंधित समस्या संपण्याची शक्यता आहे.

**मकर**
तुमचे वडील त्यांच्या मुलांच्या इच्छा पूर्ण करण्याचा प्रयत्न करतील. नवीन व्यवसाय सुरू करायचा आहे त्यांनी आज बाजार विश्लेषण करणे चांगले राहील.

**कुंभ**
व्यस्त दिवसातून थोडा वेळ मुलांसाठी काढाल आणि तुम्ही त्यांच्यासोबत वेळ घालवण्याचा आनंद घ्याल. आर्थिक उत्पन वाढेल, टेन्शन कमी होईल.

**मीन**
एखाद्या खास व्यक्तीशी बोलू शकता. तुम्हाला आर्थिक फायदा देखील होईल, उत्पन्नाचे नवीन स्रोत सापडतील. लहान मुले आज खूप आनंदी असतील.

# पश्चिम रेल्वेवर रविवारपासून चार नव्या लोकल

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई** : प्रवाशांच्या सोयीसाठी पश्चिम रेल्वेकडून १ फेब्रुवारीपासून १२ डब्यांच्या ४ अतिरिक्त नॉन-एसी लोकल फेऱ्या सुरू करण्यात येणार आहेत. या सर्व फेऱ्या धिम्या मार्गावर धावतील. त्यामुळे मुंबई उपनगरीय मार्गावरील लोकल सेवांची संख्या १४०६ वरून १४१० इतकी होणार आहे.

रेल्वेच्या माहितीनुसार, अप मार्गावर भाईंदर–वांद्रे व भाईंदर–चर्चगेट, तर डाऊन मार्गावर वांद्रे–भाईंदर या दोन अतिरिक्त फेऱ्या सुरू होतील. कांदिवली–बोरिवली दरम्यान सहाव्या मार्गाचे काम पूर्ण झाल्याने या फेऱ्या वाढवणे शक्य झाले असून काही लोकलच्या वेळापत्रकात किरकोळ बदल करण्यात आले आहेत.



















# अजित पवारांच्या निधनानंतर खात्यांच्या पुनर्वाटपाबाबत निर्णयाची शक्यता

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. २९**

**मुंबई :** राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनानंतर त्यांच्या ताब्यात असलेल्या महत्त्वाच्या खात्यांची जबाबदारी आता कुणाकडे सोपवली जाणार, याबाबत लवकरच निर्णय होण्याची शक्यता आहे. यासंदर्भात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र देण्यात येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. अजित पवार यांच्याकडे अर्थ, क्रीडा आणि राज्य उत्पादन शुल्क ही अत्यंत महत्त्वाची खाती होती. ही तीनही खाती राष्ट्रवादी काँग्रेसच्या वाट्याची असल्याने ती खाती पक्षाकडेच राहावीत, यासाठी राष्ट्रवादीकडून प्रयत्न सुरू आहेत. त्यामुळे ही खाती राष्ट्रवादीतील कोणत्या मंत्र्याकडे देण्यात यावीत, याबाबत मुख्यमंत्र्यांना अधिकृत पत्र देण्यात येणार असल्याची माहिती विश्वसनीय सूत्रांनी दिली आहे. अर्थ खात्यासारखे महत्त्वाचे खाते अजित पवारांकडे होते. त्यामुळे त्यांच्या निधनानंतर हे खाते कुणाकडे द्यावे, यासाठी राष्ट्रवादी काँग्रेसमधील ज्येष्ठ नेत्यांमध्ये अंतर्गत चर्चा सुरू असल्याची माहिती आहे. दादांकडे असलेली सर्व खाती कोणत्या नेत्यांकडे सोपवावीत, याबाबतची नावे अंतिम करून ती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे सादर करण्यात येणार असल्याचेही सांगण्यात येत आहे. पक्षातील ज्येष्ठ मंत्र्यांकडे ही खाती सोपवली जाण्याची शक्यता अधिक असून, त्याचबरोबर एखाद्या आमदाराला मंत्रिपद देऊन त्याच्याकडे ही खाती देण्याची शक्यता तपासली जात असल्याची माहितीही समोर येत आहे. त्यामुळे येत्या काळात मंत्रिमंडळातील बदलांबाबत महत्त्वाचे निर्णय होण्याची चिन्हे आहेत.



# "सुनेत्रा वहिनींना उपमुख्यमंत्री करा"

## नवाब मलिक, नरहरी झिरवाळ यांच्याकडून दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येण्याचे संकेत

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**■ प्रतिनिधी / दि. २९**

**बारामती :** दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष एकत्र यावेत, ही जनतेची इच्छा असून त्यानुसार लवकरच निर्णय घेण्यात येईल, अशी भूमिका राष्ट्रवादीच्या नेत्यांनी गुरुवारी मांडली. तसेच अजित पवार यांच्या निधनानंतर राष्ट्रवादीची धुरा सुनेत्रा पवार यांनी सांभाळावी आणि त्यांना उपमुख्यमंत्री करण्यात यावे, अशी स्पष्ट मागणी राज्याचे अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांनी केली. सुनेत्रा पवार यांच्या मंत्रिमंडळातील सहभागाबाबत वरिष्ठ पातळीवर चर्चा करण्यात येईल, असेही त्यांनी सांगितले. अजित पवार यांच्या पार्थिवावर बारामती येथील विद्या प्रतिष्ठानच्या मैदानात शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसच्या अनेक ज्येष्ठ नेत्यांनी अजित पवार यांना श्रद्धांजली अर्पण केली. अंत्यसंस्कारानंतर माध्यमांशी संवाद साधताना नरहरी झिरवाळ आणि नवाब मलिक यांनी दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येण्याचे संकेत दिले. झिरवाळ म्हणाले, "सुनेत्रा पवार यांनी राष्ट्रवादीची धुरा सांभाळावी आणि त्यांना उपमुख्यमंत्री करण्यात यावे. हीच अजित दादांना खरी श्रद्धांजली ठरेल. यासाठी आम्ही वरिष्ठ पातळीवर चर्चा करणार आहोत." ते पुढे म्हणाले, "दोन्ही राष्ट्रवादी एकत्र याव्यात, ही संपूर्ण महाराष्ट्राची मागणी होती. आता अजित दादांच्या जाण्यानंतर ही मागणी अधिकच जोरकस होणार आहे. विखुरलेले राहून चालणार नाही, एकत्रच राहावे लागणार आहे. हे केवळ आमचेच नव्हे, तर सर्वसामान्य जनतेचेही विचार आहेत," असे त्यांनी स्पष्ट केले. अजित पवार यांच्या निधनानंतर राज्याच्या राजकारणात मोठ्या घडामोडी घडत असून, राष्ट्रवादी काँग्रेसच्या भविष्यातील नेतृत्व आणि एकीबाबत लवकरच महत्त्वाचे निर्णय होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

# सहकारी शेतकी संस्थेची जमीन शासनजमा

## ○उच्च न्यायालयाचा निर्णय

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. २९**
**अंबरनाथ :**

अंबरनाथ सहकारी सामुदायिक शेतकी संस्थेला सन १९६३ मध्ये शेतीसाठी विनामूल्य दिलेली तब्बल २१० एकर सरकारी जमीन अखेर शासनजमा होणार आहे. मुंबई उच्च न्यायालयाने संस्थेचे अपील फेटाळून लावत राज्य सरकारचा जमीन पुनर्ग्रहणाचा निर्णय पूर्णतः योग्य ठरवला आहे. या जमिनीचा बहुतांश भाग शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाची इमारत उभारण्यासाठी वापरला जाणार असल्याने, अंबरनाथमधील वैद्यकीय शिक्षणाच्या प्रकल्पाचा मार्ग मोकळा झाला आहे.

न्यायमूर्ती जी. एस. कुलकर्णी आणि न्यायमूर्ती आरती साठे यांच्या खंडपीठाने दि. २८ जानेवारी २०२६ रोजी दिलेल्या निकालात याबाबत सविस्तर निरीक्षण नोंदवले आहे. शेतीसाठी दिलेल्या सरकारी जमिनीचा मोठ्या प्रमाणावर गैरवापर झाल्याचे स्पष्ट होत असून, संबंधित संस्थेने अनुदानाच्या अटींचे गंभीर उल्लंघन केल्याचे न्यायालयाने नमूद केले आहे.

शासनाने ही जमीन सहकारी शेतीला प्रोत्साहन देण्यासाठी दिली होती. अटींनुसार, ही जमीन एका वर्षाच्या आत लागवडीखाली आणणे बंधनकारक होते; अन्यथा शासनाला जमीन परत घेण्याचा अधिकार होता. मात्र प्रत्यक्ष पाहणीत असे आढळून आले की केवळ ७.६८ हेक्टर (सुमारे १९ एकर) क्षेत्रातच काही प्रमाणात झाडांची लागवड होती. उर्वरित जमिनीवर मोठ्या प्रमाणावर बेकायदेशीर घरे व चाळी, दुकाने व शेड, फार्महाऊस तसेच सुमारे ४०० ते ५०० अतिक्रमणे उभी राहिलेली होती. शेतीचा वापर जवळजवळ पूर्णतः बंद झाल्याचेही स्पष्ट झाले.

तपास अहवालात आणखी गंभीर बाबी समोर आल्या असून, संस्थेने मूळ शेतकरी सभासदांना बाजूला सारून श्रीमंत आणि शेतीशी कोणताही संबंध नसलेल्या सदस्यांना सभासदत्व दिल्याचे उघड झाले होते. शेतीसाठी दिलेली जमीन प्रत्यक्षात रिअल इस्टेटच्या वापरासाठी वापरली गेल्याचे न्यायालयाने नमूद केले आहे.

दरम्यान, अंबरनाथमध्ये या शेतकी संस्थेची जमीन ही एकेकाळी प्रतिष्ठेचे प्रतीक मानली जात होती. मात्र नागरिकीकरणाच्या रेट्यात आणि बेकायदेशीर वापरामुळे या जमिनीचा मूळ उद्देशच नष्ट झाल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले. या निर्णयामुळे एकीकडे शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचा मार्ग मोकळा झाला असून, दुसरीकडे सरकारी जमिनीच्या गैरवापराविरोधात महत्त्वाचा न्यायालयीन संदेशही दिला गेला आहे.

# फ्लाईट अटेंडंट पिंकी माळींचं पार्थिव अंत्यदर्शनासाठी कळव्यात

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. २९**

**ठाणे :** उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या झालेल्या विमान अपघातात अजित पवार यांच्यासह फ्लाईट अटेंडंट पिंकी माळी यांचाही दुर्दैवी मृत्यू झाला. जिल्हा परिषदेच्या निवडणुकीच्या निमित्ताने अजित पवार बारामती येथे विमानाने जात होते. या विमानात फ्लाईट अटेंडंट म्हणून पिंकी माळी यांची नियुक्ती करण्यात आली होती. विमानाने उड्डाण घेतल्यानंतर बारामती परिसर दृष्टीक्षेपात येताच अचानक विमानावरील नियंत्रण सुटले आणि विमान कोसळले. या भीषण अपघातात अजित पवार, पिंकी माळी यांच्यासह विमानातील सर्व प्रवाशांचा मृत्यू झाला. पिंकी माळी यांचा सुमारे दोन ते अडीच वर्षांपूर्वी सोमविकार सैनी यांच्याशी विवाह झाला होता. दीड वर्षांपूर्वी पिंकी आणि तिच्या पतीने कळवा येथील रिव्हिरिया सोसायटीमध्ये घर घेतले होते. गेले एक वर्ष पिंकी आपल्या पतीसह कळव्यात वास्तव्यास होती. त्यामुळे तिचे पार्थिव अंत्यदर्शनासाठी कळव्यातील त्यांच्या निवासस्थानी आणण्यात आले. पार्थिव आणल्याची माहिती मिळताच रिव्हिरिया सोसायटीतील रहिवासी, शेजारी आणि परिचितांनी मोठ्या संख्येने तिच्या घराजवळ गर्दी केली होती. अल्पावधीतच पिंकीने सर्वांशी जिव्हाळ्याचे नाते निर्माण केले होते. त्यामुळे तिचे पार्थिव पाहून अनेकांना अश्रू अनावर झाले. अंत्यदर्शनानंतर पिंकी माळी यांचे पार्थिव अंत्यसंस्कारासाठी मुंबई येथे नेण्यात आले. पिंकी माळी यांच्या अकाली निधनाने कळवा परिसरात हळहळ व्यक्त होत असून, एक प्रेमळ, हसतमुख आणि आपुलकीची व्यक्ती काळाच्या पडद्याआड गेल्याची भावना सर्वत्र दिसून येत आहे. पिंकीने सर्वांशी आपलेपणाचे नाते निर्माण केले होते. त्यामुळे तिच्या निधनाने सर्वांनाच मोठा धक्का बसला आहे," अशी भावूक प्रतिक्रिया फ्लाईट अटेंडंट पिंकी माळी हिच्या कळव्यातील शेजाऱ्यांनी व्यक्त केली.

# उल्हासनगरात आज पाणीपुरवठा बंद

## शनिवारीही मर्यादित पुरवठा

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. २९**

**उल्हासनगर :** महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (एमआयडीसी) तर्फे जांभूळ जलशुद्धीकरण केंद्र तसेच बारवी गुरुत्ववाहिनीवर महत्त्वाचे दुरुस्ती व देखभाल काम हाती घेण्यात आल्यामुळे उल्हासनगर शहराचा पाणीपुरवठा तब्बल २४ तास पूर्णपणे बंद राहणार आहे. गुरुवार, २९ जानेवारी रोजी मध्यरात्री १२ वाजेपासून ते शुक्रवार, ३० जानेवारी रोजी मध्यरात्री १२ वाजेपर्यंत हा पुरवठा बंद राहील. या कालावधीत उल्हासनगर महानगरपालिकेला होणारा पाणीपुरवठा पूर्णतः ठप्प राहणार असून कॅम्प क्रमांक ४, कॅम्प क्रमांक ५ तसेच कॅम्प क्रमांक ३ मधील काही भागांत नागरिकांना पाण्याचा तुटवडा जाणवण्याची शक्यता आहे. एमआयडीसीकडून जांभूळ जलशुद्धीकरण केंद्र आणि बारवी गुरुत्ववाहिनीवरील देखभाल व तांत्रिक दुरुस्तीची कामे अत्यावश्यक असल्याने हा निर्णय घेण्यात आल्याची माहिती देण्यात आली आहे. त्यामुळे नागरिकांनी आवश्यक तेवढे पाणी साठवून ठेवावे व जपून वापरावे, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.






# जिल्हा परिषद, पंचायत समित्यांच्या निवडणुका पुढे ढकलल्या

पान १ वरून ▶▶▶

आणि मतमोजणीच्या तारखा पुढे ढकलण्याचा निर्णय घेतला आहे.

**■ सुधारित निवडणूक कार्यक्रम कधी जाहीर होणार?**

राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार संबंधित जिल्हाधिकारी 31 जानेवारी रोजी सुधारित निवडणूक कार्यक्रमाची अधिकृत सूचना प्रसिद्ध करणार आहेत. त्यानुसार आता 7 फेब्रुवारी 2026 रोजी सकाळी 7.30 ते सायंकाळी 5.30 या वेळेत मतदान होणार आहे.

**■ प्रचाराची मुदत व मतमोजणीची वेळ**

नवीन कार्यक्रमानुसार जाहीर प्रचाराची समाप्ती 5 फेब्रुवारी रोजी रात्री 10 वाजता होईल. तर 9 फेब्रुवारी 2026 रोजी सकाळी 10 वाजता मतमोजणी सुरू करण्यात येणार आहे. निकाल जाहीर झाल्यानंतर संबंधित ठिकाणची आचारसंहिता तात्काळ संपुष्टात येईल.

**■ निवडून आलेल्या सदस्यांची नावे राजपत्रात**

मतमोजणी पूर्ण झाल्यानंतर निवडून आलेल्या जिल्हा परिषद व पंचायत समिती सदस्यांची नावे 11 फेब्रुवारी 2026 पर्यंत शासन राजपत्रात प्रसिद्ध केली जाणार आहेत. त्यामुळे या निवडणुकीची संपूर्ण प्रक्रिया फेब्रुवारीच्या दुसऱ्या आठवड्यात पूर्ण होणार आहे.


## कल्याण डोंबिवली महानगरपालिका
### उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभाग

**नोटीस**

कल्याण डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील खालील नमूद अर्जदाराने विकास कामात बाधित होणारी झाडे तोडणे/पुनर्रोपण करणेस परवानगी मागीतली आहे.

| अ. क्र. | अर्जदाराचे नाव | झाडे तोडावयाचे ठिकाण | बाधित झाडांची संख्या | झाडे तोडण्याचे कारण |
|---|---|---|---|---|
| १ | मे. आदित्य बिल्डकॉन तर्फे कु.मु.प.धा. श्री. अमोघ जोशी आणि सचिन स. काटके | सि.टी.स.नं. ५२६१ मौजे - नवी डोंबिवली | ०३ | नविन इमारतीच्या पोहोच रस्त्यात बाधित होत असल्याने |
| २ | मे. पॅरडाईस डेव्हलपर्स तर्फे श्री. रमेश नारायण वीरकर आणि इतर, कु.मु.प. धा. मे. पॅरडाईस डेव्हलपर्स तर्फे भागीदार श्री. समीर अरुण काळे | सि.टी.स.नं. १०१८१/अ/१, १०१८१/अ/२, १०१८२/अ, १०१८२/ब, १०१८४/अ, १०१८४/ब, १०१८५ ते १०१८८ मौजे - डोंबिवली | ०२ | नविन इमारतीच्या बांधकामात बाधित होत असल्याने |

सदरची झाडे तोडण्यास/पुनर्रोपणास परवानगी देणे अगोदर कोणाच्या काही हरकती असल्यास त्या महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम १९७५ चे कलम ८ (३) अन्वये मागविण्यात येत आहेत.

तरी कोणाच्या हरकती असल्यास ७ दिवसाच्या आत उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभागात लेखी स्वरुपात योग्य त्या कागदपत्रांसह देण्यात याव्यात. मुदतीत हरकती न आल्यास सदरची झाडे तोडणे/पुनर्रोपण करणेस वरील अधिनियमानुसार सशर्त परवानगी देणेबाबत पुढील कार्यवाही करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

**जावक क्रमांक**
**कडोंमपा/जसंवि/ मुका/८८२**
**दिनांक :- २९/०१/२०२६**

**सही/-**
**(संजय जाधव)**
**वृक्ष अधिकारी, वृक्ष प्राधिकरण विभाग,**
**कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण**



महाराष्ट्र शासन

## कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय

सा. बां. विभाग क्र. १, पार्किंग प्लाझा बिल्डिंग, ८ वा मजला, सर्विस रोड, पूर्व द्रुतगती महामार्गालगत, ज्युपिटर हॉस्पीटल जवळ, ठाणे - ४००६०१
E-mail : thane1.ee@mahapwd.gov.in दूरध्वनी : २५३६९२९३

### ई-निविदा शुध्दीपत्रक क्र. १ (वेळापत्रक)

**कामाचे नाव** : जिल्हा सामान्य रूग्णालय ठाणे येथे ९०० खाटांचे जिल्हा सामान्य रूग्णालय, संदर्भ सेवा रूग्णालय व परिचारिका प्रशिक्षण केंद्र व वसतीगृहाचे इमारतीचे बांधकाम करणे ता. जि. ठाणे. (फर्निचर बनविणे, पुरवठा करणे व बसविणे)

**अंदाजित रक्कम** : रु. ५१,१०,७४,३६१.००

**संदर्भ** : निविदा सुचना क्र. ३९ सन २०२५-२६ या कार्यालयाचे पत्रक्र. जा.क्र/ठावि/निविदा/३१६ दि. १६/०१/२०२६.

| अ.क्र. | निविदा | पुर्वी प्रसिध्द झालेला मजकुर / दिनांक | बदल करण्यात आलेला मजकुर / दिनांक |
|---|---|---|---|
| १ | निविदा विक्री | २०.०१.२०२६ ते ०४.०२.२०२६ | २०.०१.२०२६ ते १२.०२.२०२६ |
| २ | निविदापुर्व बैठक | २७.०१.२०२६ | ०५.०१.२०२६ |
| ३ | निविदा उघडण्याचा दिनांक | ०५.०२.२०२६ | १३.०२.२०२६ |

**जावक क्रमांक**
**जा.क्र.सा.बां./ठावि/निविदा/४८८**
**दिनांक : २८/०१/२०२६**

**सही/-**
**कार्यकारी अभियंता**
**सा.बां. विभाग क्र.१, ठाणे**



ठाणे ■ शुक्रवार
३० जानेवारी २०२६
दैनिक ठाणे
जीवनदीप वार्ता




# टेंभरे (बु.) ग्रामपंचायतीच्या महिला उपसरपंचपदी सुनंदाताई गायकवाड यांची निवड

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**मुरबाड** : मुरबाड तालुक्यातील प्रतिष्ठित मानल्या जाणाऱ्या तंटामुक्ती तथा हागणदारी मुक्त ग्राम सन्मानित टेंभरे (बु.) ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी सुनंदाताई कैलास गायकवाड यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे. विशेष म्हणजे गावाच्या इतिहासात पहिल्यांदाच महिला उपसरपंच होण्याचा मान त्यांनी पटकावला आहे.



ग्रामपंचायतीच्या ज्येष्ठ सदस्या असलेल्या सुनंदाताई गायकवाड यांच्या निवडीमुळे गावातील अनेक प्रलंबित विकासकामे जलद मार्गी लागतील, असा विश्वास सरपंच सुहास केंबारी यांनी व्यक्त केला. त्यांच्या निवडीबद्दल गावात सर्व स्तरांतून शुभेच्छांचा वर्षाव होत असून विशेषतः महिला वर्गात उत्साहाचे वातावरण आहे.

या निवडीप्रसंगी माजी सरपंच दिलीप केंबारी, शरद केंबारी, माजी उपसरपंच सुरेश जाधव, अभय केंबारी, धनाजी टोहके, ग्रामपंचायत सदस्य संजय केंबारी, नंदा केंबारी, शुभांगी पवार, मंगला खुटारे, तसेच राजेश केंबारी, दामोदर जाधव, भगवान जाधव यांच्यासह मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.

ग्रामसेविका ज्योती पवार, अंगणवाडी सेविका मोनिका केंबारी तसेच गावातील महिलांनी सुनंदाताई गायकवाड यांचे विशेष अभिनंदन केले. प्रथमच महिला उपसरपंचपदाचा मान मिळाल्याने गावातील महिलांमध्ये आत्मविश्वास व आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

# गीता प्रज्ञा शोध परीक्षेत सुनील परटोले अव्वल



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**शहापूर ग्रामीण** : वासिंद जवळील जिल्हा परिषद शाळा कळमपाडा येथे कार्यरत असलेले प्राथमिक शिक्षक सुनिल परटोले यांनी गीता प्रज्ञा शोध परीक्षेत प्रथम क्रमांक पटकावून अव्वल स्थानी राहिले आहेत.

गोवर्धन इको व्हिलेज, गायतरे येथील ग्रामीण शिक्षण विभागाच्या वतीने पालघर व ठाणे जिल्ह्यातील शिक्षकांसाठी गीता प्रज्ञाशोध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये जवळपास 50 शिक्षक स्पर्धेकांनी या स्पर्धेत भाग घेतला होता. सदर स्पर्धेचा निकाल नुकताच जाहीर झाला असून या स्पर्धेत सुनिल परटोले यांनी प्रथम क्रमांक पटकावला आहे.

या स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल त्यांना रोख रक्कम रुपये दहा हजार रुपये, प्रमाणपत्र व मानचिन्ह (ट्रॉफी) देऊन गौरविण्यात आले. भगवद्गीतेतील तत्त्वज्ञान, श्लोकांचे अर्थ व त्यांचा जीवनातील उपयोग याविषयी शिक्षकांमध्ये अभ्यासवृत्ती वाढावी तसेच ते संस्कार विद्यार्थ्यांपर्यंत पोहचावे व सुजाण नागरिक तयार व्हावेत या उद्देशाने ही स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. सुनिल परटोले यांच्या या यशाबद्दल शिक्षकवर्ग, शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवर व हितचिंतकांकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# शिव समर्थ विद्यालयातील विद्यार्थ्यांनी घेतला शेकोटीच्या उबेचा आनंददायी अनुभव

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** : विद्यार्थ्यांमध्ये सकारात्मक वर्तन, जबाबदारीची जाणीव, सहकार्यवृत्ती आणि नेतृत्वगुणांचा विकास व्हावा, तसेच शिक्षणातील ताणतणाव, उदासीनता व नैराश्य दूर व्हावे या उद्देशाने राज्य मंडळाच्या सर्व शाळांमध्ये राबविण्यात येणाऱ्या 'आनंददायी शनिवार' उपक्रमांतर्गत शिव समर्थ विद्यालय, प्राथमिक विभागाच्या वतीने 'आनंदी शनिवार' उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांसाठी शेकोटी हा आगळावेगळा व आनंददायी उपक्रम आयोजित करण्यात आला. या उपक्रमात विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग व प्रचंड उत्साह पाहायला



मिळाला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला उपशिक्षक देविदास सानप सर यांनी शेकोटीचे महत्त्व थोडक्यात विशद केले. त्यानंतर त्यांनी घेतलेला 'मुंबई टू गोवा' हा मनोरंजक खेळ विद्यार्थ्यांच्या विशेष पसंतीस उतरला. खेळादरम्यान विद्यार्थ्यांचा आनंद आणि उत्साह अक्षरशः ओसंडून वाहत होता.

मातृसंस्थेचे शास्ता चैतन्य साठे, प्राथमिक शालेय समितीचे अध्यक्ष अनिल हजारे, ज्येष्ठ सदस्य निशिकांत साठे, अतुल राजे, सदस्या सविता कळके, कार्यकारी मंडळाच्या सदस्या कीर्ती वैद्य तसेच विद्यालयाच्या मुख्याध्यापिका ललिता डावरे यांची कार्यक्रमास विशेष उपस्थिती लाभली. मातृसंस्थेचे शास्ता चैतन्य साठे यांच्या शुभहस्ते शेकोटी पेटविण्यात आली. यावेळी उपशिक्षिका सुवर्णा कोळी व शीला माळी यांनी शेकोटी भोवती विद्यार्थ्यांसोबत छानछान गाणी घेतली. उपशिक्षक संजीव राठोड, कैलास उतेकर, साक्षी पावसकर व तेजस्विनी यादव यांनी विद्यार्थ्यांसह फेर धरत गाण्याचा मनमुराद आनंद लुटला. सेविका प्राजक्ता गायकर यांनी शेकोटीसाठी आवश्यक साहित्य तसेच विद्यार्थ्यांच्या सहभोजनाची उत्तम तयारी केली होती. हा उपक्रम विद्यार्थ्यांसाठी आनंद, मनोरंजन आणि सामूहिक सहभागाचा अविस्मरणीय अनुभव ठरला.

# 'दिघे यांच्या प्रेरणेमुळे विजयी घोडदौड'

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** : शिंदेसेनेला मिळालेल्या यशामागे आनंद दिघे यांची प्रेरणा, त्यांचे आशीर्वाद आणि त्यांनी दाखवलेला मार्ग हेच खरे कारण असल्याचे प्रतिपादन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले. आनंद दिघे यांच्या जयंतीनिमित्त झालेल्या कार्यक्रमात ते बोलत होते.विधानसभा, नगर परिषद आणि ७५ व्या जयंतीनिमित्त आनंद दिघे यांना वाहिली आदरांजली महापालिका निवडणुकांमध्ये शिंदेसेना सातत्याने दुसऱ्या क्रमांकाचा पक्ष ठरला असून, ही बाब समाधानकारक आणि अभिमानास्पद असल्याचे त्यांनी सांगितले. काही लोक शिंदेसेना ठाण्यापुरती मर्यादित असल्याचा दावा करत होते, मात्र झालेल्या निवडणुकांनी शिंदेसेना 'चांद्यापासून बांद्यापर्यंत' पसरल्याचे महाराष्ट्राने पाहिले आहे, असे शिंदे यांनी यावेळी स्पष्ट केले.


# कल्याण डोंबिवली महानगरपालिका

## समाज विकास विभाग

**-: जाहिर आवाहन :-**

कल्याण डोंबिवली महानगरपालिकेतील समाज विकास विभागामार्फत महापालिका क्षेत्रातील दिव्यांगकरीता स्वयंरोजगाराची संधी उपलब्ध होण्याकरीता खालील विविध प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात येत आहे.

तरी सर्व दिव्यांग नागरिकांना आवाहन करण्यात येते की, आयोजित करण्यात येणा-या स्वयंरोजगार प्रशिक्षणाच्या संधीचा लाभ घ्यावा.

| क्र | प्रशिक्षण | प्रशिक्षणार्थी संख्या |
|---|---|---|
| १ | Domestic IT Helpdesk Attendent | २० |
| २ | Domestic Data Entry Operator | २० |
| ३ | अगरबत्ती मेकिंग | २० |
| ४ | Graphic Designer | २० |
| ५ | Customer Care Executive Domestic Voice | २० |
| ६ | Short Hand | २० |

खालील सर्व कागदपत्रांची छायांकित प्रती अर्जासोबत जोडून समाज विकास विभाग, मुख्यालय, कल्याण डोंबिवली महानगरपालिका येथे जमा करावीत.

**आवश्यक कागदपत्रे-**

१) विहित नमुन्यातील अर्ज
२) फोटो
३) उत्पन्नाचा दाखला (रु. २,४०,०००/- पेक्षा कमी)
४) UDID Card
५) महापालिकेत नोंदणी असल्याचा पुरावा
६) आधारकार्ड/ शासनाकडील नोंदणीकृत ओळखपत्र
७) रेशन कार्ड

**अर्ज करणेसाठी अंतिम दिनांक** - १०/०२/२०२६

**जा.क्र.कडोंमपा/सविवि/मुका / ६७३**
**दिनांक २९/०१/२०२६**
**जा.क्र. कडोंमपा /जसंवि/मुका/८८५**
**दिनांक :- २९/०१/२०२६**

**सही /-**
**(कांचन गायकवाड)**
**उप आयुक्त(सविवि)**
**कल्याण डोंबिवली महानगरपालिका**


# महाकाली तरुण मंडळाच्या वतीने पेण येथे रक्तदान शिबीर



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**पेण** : भारतीय प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून 26 जानेवारी रोजी पेण शहरातील महाकाली तरुण मंडळ व त्वष्टा कासार समाज मंदिर पेण तसेच लायन्स हेल्थ फाउंडेशन अलिबाग यांच्या संयुक्त विद्यमाने पेण शहरातील महाकाली मंदिरात मोफत नेत्र चिकित्सा मोतीबिंदू शिबीर व रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

रक्तदान हे जीवनदान आहे रक्तदान करणे काळाची गरज आहे या उदात्त हेतूने प्रेरित होऊन तरुण मंडळाने आणि समाजाने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते या रक्तदान शिबिराला पेण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संदीप बागुल यांनी भेट देऊन रक्तदान ही केले त्याबद्दल त्यांचे विशेष अभिनंदन करण्यात आले.

पेण शहरातील नागरिकांनी या नेत्र चिकित्सा शिबिर आणि मोतीबिंदू शिबिराचा लाभ ६८ नागरिकांनी तर महिला व पुरुष असे ६०जणांनी रक्तदान केले. हे शिबिर यशस्वी करण्यासाठी महाकाली तरुण मंडळाचे अध्यक्ष कल्पेश हजारे, उपाध्यक्ष प्रथमेश चाचड, सेक्रेटरी प्रथमेश पोटफोडे, खजिनदार ऋषिकेश गोडे,अनंत हजारे, मयुरेश चाचड, मिलिंद समेळ, मंगेश हजारे,तर त्वष्टा कासार समाज मंदिर ॲड.अध्यक्ष हेमंत वडके, उपाध्यक्ष तेजस समेळ, सचिव श्रीमती राजश्री पोटफोडे, खजिनदार सागर हजारे सहसचिव सौ.शिला हजारेआदीनी मेहनत येऊन शिबिर यशस्वी केला. या शिबिराला अनेक मान्यवरांनी भेट दिली.

# वाल्मीक मोरे यांना पत्नी शोक

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : कल्याण येथील समाज सेवक आणि भोई समाज सेवा संस्था कल्याण चे उपाध्यक्ष वाल्मिक मोरे यांची पत्नी अलका मोरे यांचे मंगळवार दिनांक २७/१/२०२६ रोजी दीर्घ आजाराने दुःखद निधन झाले आहे. त्या ६४ वर्षाच्या होत्या कल्याण पश्चिम लाल चौकी येथील स्मशानभूमीत त्यांचे अंतिमसंस्कार करण्यात आले. अलका मोरे या एक आदर्श शिक्षिका म्हणून त्यांची ख्याती होती. त्या उल्हासनगर महापालिका



शाळेत शिक्षिका म्हणून पाच वर्षा पूर्वी सेवानिवृत झाल्या होत्या. त्यांच्या पश्चात पती, एक मुलगा, एक मुलगी, सुन, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

# थकीत वेतन देयके ऑनलाईन सादर करण्यास मुदतवाढ

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** : सध्या राज्यातील कर्मचाऱ्यांना सातवा वेतन आयोग (7th Pay Commission) लागू असून, आपल्या हक्काचे प्रलंबित वेतन (Arrears) आणि भत्ते मिळण्याची वाट पाहणाऱ्या हजारो कर्मचाऱ्यांसाठी शिक्षण संचालनालयाने एक महत्त्वपूर्ण परिपत्रक जारी केले आहे. तरी सुद्धा राज्यातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना देई असलेली थकीत देयके व बिले ऑनलाईन पद्धतीने सादर करण्यासाठी आडचणी येत आहेत. थकीत देयके व बिले सादर करण्यासाठी दिनांक 10 जानेवारी 2026 पर्यंत ची मुदत देण्यात आलेली होती. परंतु प्रणालीतील तांत्रिक अडचणी, सर्व्हरची समस्या, तसेच संबंधित कार्यालयामध्ये आवश्यक माहिती अद्ययावत करण्यात येणाऱ्या अडचणीमुळे अनेक शिक्षक व कर्मचारी आपली देयके वेळेत ऑनलाईन सादर करू शकले नाहीत. त्यामुळे सर्व शिक्षक संघटना कडून थकीत वेतन देयके व बिले सादर करण्यासाठी दिलेली दिनांक 10 जानेवारी 26 रोजीची मुदत वाढून मिळावी अशी मागणी करण्यात येत होती. या मागणीची दखल घेऊन शिक्षण संचालक यांनी थकीत वेतन देयके शालार्थ प्रणाली मध्ये ऑनलाईन सादर करण्यासाठी दि.02 फेब्रुवारी 26 पर्यंत मुदत वाढ देण्यात आलेले आहे. शालार्थ प्रणालीद्वारे सादर करावयाच्या थकीत देयकांसाठी (Pending Bills) आता मुदतवाढ देण्यात आली आहे. यामुळे ज्यांची (7th Pay Commission Arrears Payment) किंवा इतर कोणतीही जुनी देयके अद्याप प्रलंबित आहेत, त्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. थकीत वेतन देयके शालार्थ प्रणालीमध्ये ऑनलाईन सादर करण्यास अंतिम मुदत 02 फेब्रुवारी 2026 पर्यंत वाढवण्यात आली आहे. शिक्षण विभागाने आपल्या पत्रात नमूद केले आहे की, ही मुदतवाढ अंतिम असेल. 02 फेब्रुवारी 2026 नंतर सन 2025-26 या आर्थिक वर्षासाठी कोणतीही थकीत देयके स्वीकारली जाणार नाहीत. जर या विलंबाने देयके मिळण्यास अडचण निर्माण झाली, तर त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित अधिकाऱ्यांची राहील.

# उडान २०२६ महोत्सवात जीवनदीप महाविद्यालयाच्या DLLE विद्यार्थ्यांचे यश

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**गोवेली** : येथील जीवनदीप महाविद्यालयाच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभाग अंतर्गत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी 'उडान–विस्तार कार्याची गरुडझेप' या वार्षिक महोत्सवात विविध स्पर्धांमध्ये उल्लेखनीय यश संपादन केले. मुंबई विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन आणि विस्तार विभाग तसेच साकेत महाविद्यालय, कल्याण यांच्या संयुक्त विद्यमाने उडान २०२५–२६ या महोत्सवाचे आयोजन दि. २७ जानेवारी २०२६ रोजी साकेत महाविद्यालय, कल्याण येथे करण्यात आले होते.



या महोत्सवात मुंबई विद्यापीठाशी संलग्न ३४ महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता. या महोत्सवात पोवाडा गायन, पथनाट्य, वक्तृत्व, सृजनशील लेखन, पोस्टर मेकिंग अशा विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये जीवनदीप महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी पोवाडा, पथनाट्य व पोस्टर मेकिंग या स्पर्धांमध्ये उत्स्फूर्त सहभाग घेतला. स्पर्धेच्या निकालात जीवनदीप महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी पोवाडा गायन स्पर्धेत द्वितीय क्रमांक, तर पथनाट्य स्पर्धेत उत्तेजनार्थ क्रमांक पटकावून महाविद्यालयाच्या नावलौकिकात भर घातली. या यशस्वी सहभागाच्या वेळी DLLE विभागाच्या प्रमुख प्रा. रुपाली तरे व प्रा. वैभव सुतार विद्यार्थ्यांसोबत उपस्थित होते. या उल्लेखनीय यशाबद्दल जीवनदीप शैक्षणिक संस्थेचे अध्यक्ष मा. रविंद्र घोडविंदे संचालिका सौ. स्मिता घोडविंदे , संचालक मा.प्रशांत घोडविंदे , महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अशोक वाघ , उपप्राचार्य हरेंद्र सोष्टे तसेच सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# नवचैतन्य लोकसंचलित साधन केंद्राच्या वतीने तालुकास्तरिय सुधारक सन्मान पुरस्काराचे वितरण

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**मुरबाड** : दि. 26/1/2026 रोजी महिला आर्थिक विकास महामंडळ अंतर्गत स्थापित असलेल्या नवचैतन्य लोकसंचलित साधन केंद्र मुरबाड अंतर्गत नवतेजस्विनी महाराष्ट्र ग्रामीण महिला उद्योम विकास प्रकल्प अंतर्गत महिला सक्षमीकरण कार्यक्रमात महिलांचा सर्वांगिण विकास घडवून आणण्यासाठी उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या पुरुषांचा "सुधाकर सन्मान पुरस्कार वितरण सोहळा" हिराजी गोमाजी पाटील सभागृह, डाकबंगला मुरबाड येथे



घेण्यात आला असून या कार्यक्रमाची सुरुवात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले व राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.माविमच्या प्रार्थनेने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक cmrc अध्यक्षा सुरेखा खोळंबे यांनी केले. त्यानंतर उपस्थित 30 सुधारक सन्मान पुरूष यांना सन्मानचिन्ह, टी शर्ट,टोपी व श्रीफल देऊन स्वागत करण्यात आले. या कार्यक्रमास विढे गावचे सरपंच,माल्हेड गावचे सरपंच तसेच नांदगावचे सरपंच, तसेच पत्रकार शंकर करडे, दिलीप पवार, यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. तसेच या कार्यक्रमात गटातील महिलांना बियाणे सुद्धा वाटप करण्यात आले.तसेचआजच्या कार्यक्रमातील उत्सवमूर्ती असणाऱ्या काही पुरुषांनी त्याचे मनोगत व्यक्त करत माविम च्या कार्याचे कौतुक केले. या कार्यक्रमास cmrc कार्यकारिणी ,गटातील महिला व सहयोगीनी विद्या खाटेघरे यांच्या सह मोठ्या संख्येने महिला उपस्थित होत्या.

# दीड महिन्याच्या लढ्यानंतर नोवेल साळवे प्रकरणाला न्यायाची वाट

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : कल्याण मधील सामाजिक कार्यकर्ते तथा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे माजी प्रदेश सचिव नोवेल साळवे यांच्यावर उल्हासनगर येथे हल्ला करण्यात आला होता. या हल्ल्यात साळवे गंभीर जखमी होऊन त्यांना कार्डियक अटॅक आला होता. याप्रकरणी एक वर्षाहून जास्त कालवधी उलटून देखील गुन्हा दाखल केला नव्हता. या प्रकरणी साळवे यांनी दीड महिन्याच्यावर आझाद मैदानात उपोषण आंदोलन केल्यानंतर अखेर पोलीस प्रशासनाने गुन्हा दाखल केला आहे. ९ जून २०२५ रोजी उल्हासनगर येथे एका वृद्ध सिंधी व्यक्तीला काही लोक मिळून मारत होते. सामाजिक कार्यकर्ते नोवेल साळवे त्या व्यक्तीला वाचवण्यासाठी गेले असताना त्यामधील एका अज्ञात व्यक्तीकडून साळवे यांच्या वर प्राणघातक हल्ला करण्यात आला होता. त्या हल्ल्यात साळवे यांचा ब्लडप्रेशर स्ट्रोक झाला व त्यांना कार्डियक अटॅक आला होता. त्यानंतर साळवे यांची ओपन हार्ट सर्जरी करण्यात येऊन २४ दिवस दवाखान्यात उपचार घेत होते. या घटनेची माझ्या कुटुंबियांनी उल्हासनगर मध्यवर्ती पोलीस स्टेशनच्या पोलिसांना माहिती देऊन सुद्धा त्यांनी त्यावेळेस कुठलीच ठोस कार्यवाही केली नाही. त्यावर आश्चर्याची गोष्ट अशी की पोलिसांनी साळवे यांचा जवाब न नोंदविता माझा केस दफ्तरी फाईल करून टाकले होते.

झालेल्या ह्या अन्याय विरोधात राज्य सरकार कडून पाऊले उचलण्यासाठी साळवे यांनी अनेक वेळा मुख्यमंत्री व वरिष्ठ नेत्यांना निवेदन दिले होते, परंतु त्या निवेदनांवर कुठलीच कारवाई झाली नसल्याकारणाने साळवे दिनांक ८/१२/२०२५ पासून आझाद मैदान मुंबई येथे उपोषण आंदोलन करत होते. त्यांच्या या आंदोलनाला दीड महिन्याच्या वर वेळ झाल्यानंतर थोडा न्याय मिळाला आहे, उल्हासनगर येथील मध्यवर्ती पोलीस स्टेशन च्या पोलिस अधिकारयांनी मंगळवारी दोषींवर गुन्हा दाखल केला आहे.







Printed by SIDDHAKALA PRINT SOLUTION LLP Published by GHODVINDE RAVINDRA NARAYAN on behalf of GHODVINDE RAVINDRA NARAYAN,
Printed at Thane and published at Building No-B-24, Room no-9, Gholap Nagar, Murbad Road, Near Anupam Nagar, Kalyan (West). Editor GHODVINDE RAVINDRA NARAYAN.
Contact No. - 908266 4781 / 9619188558 E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024